**“मार्च २०१८” या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...**

**(क) शासन निर्णय / अधिसूचना**

- दिनांक १ मार्च २०१८ च्या शासन निर्णयान्वये वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८, भाग-दुसरा नुसार पाईपलाईन गॅस पुरवठा संबंधित खर्चाच्या बाबींकरिता प्रशासनिक विभागास वित्तीय अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.
- दिनांक १ मार्च २०१८ च्या शासन आदेशान्वये श्री.र.य.गंगावणे, सहसचिव (सेवानिवृत्त) यांना सक्तीच्या सेवानिवृत्तीनंतरचे अनुकंपा निवृत्तीवेतन व उपदान मंजूर करण्यात आले आहे.
- दिनांक ५ मार्च २०१८ च्या शासन निर्णयान्वये अभियांत्रिकी सेवा, वैद्यक सेवा, शिक्षकीय सेवा यांसारख्या तांत्रिक सेवेतील गट-अ आणि गट-ब (राजपत्रित) अधिकाऱ्यांसाठी कार्यमुल्यमापन अहवालाचे स्वतंत्र नमुने विहित करण्यात आले आहेत.
- दिनांक ७ मार्च २०१८ च्या पत्रान्वये “केंद्र शासनाने दिनांक १८ जानेवारी २०१८ च्या ज्ञापनान्वये रजा प्रवास सवलतीत केलेल्या सुधारणा महाराष्ट्र संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांना अनुज्ञेय राहतील” याबाबत अवगत केले आहे.
- यापूर्वीच्या दिनांक ९ फेब्रुवारी २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये कंत्राटी नियुक्त्यांसंदर्भात दिलेल्या सूचनांचे पुनर्विलोकन करण्यात येत असल्याने, सदरहू परिपत्रकास दिनांक ७ मार्च २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये स्थगिती देण्यात आली आहे.
- दिनांक ६ मार्च २०१८ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र धोरण संशोधन संस्थेमध्ये स्थापन करण्यात येणाऱ्या संनियंत्रण कक्षासाठी, कार्यालयीन खर्चासाठी, निर्माण होणाऱ्या पदांच्या वेतनासाठी तसेच विविध कामांसाठी नवीन लेखाशीर्ष उघडण्यात आले आहे.
- दिनांक ५ मार्च २०१८ च्या पत्रान्वये बदल्या वा पदस्थापना करताना प्रशासकीय निकड लक्षात घेऊन, कार्यकारी पदांवर पदस्थापना देताना महिला अधिकारी / कर्मचाऱ्यांचा देखील विचार करण्याबाबत सूचना दिल्या आहेत.
- दिनांक १२ मार्च २०१८ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) व या विभागांतर्गत अन्य पाच कार्यालयांच्या आस्थापनेवरील १९५ अस्थायी पदे दिनांक ३० सप्टेंबर २०१८ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक १६ मार्च २०१८ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या आकृतीबंधामध्ये समाविष्ट असलेली ५९ पदे व आकृतीबंधात नसलेली ४६ पदे अशा एकूण १०५ अस्थायी पदांना दिनांक ३० सप्टेंबर २०१८ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक १७ मार्च २०१८ च्या शासन निर्णयान्वये डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेच्या ८ अस्थायी पदांना दिनांक ३० सप्टेंबर २०१८ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक १४ मार्च २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये भूतपूर्व सेवा निवड मंडळाच्या कार्यकक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) गट-क व गट-ब (अराजपत्रित) पदे सरळसेवेने भरताना “महापरीक्षा पोर्टल” चा वापर करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.
- दिनांक १५ मार्च २०१८ च्या शासन आदेशान्वये मंत्रालयीन विभागात कामकाजाच्या कार्यपद्धतीचा आढावा घेऊन प्रत्येक संवर्गाचा कार्यभार (Work load) निश्चित करण्याबाबत सहसचिव (कार्यासन-१४, १४अ, १४ब) यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीस दिनांक ३० एप्रिल २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

- दिनांक १५ मार्च २०१८ च्या शासन निर्णयान्वये मंत्रालयीन विभागातील गट-ब (अराजपत्रित) व गट-क संवर्गातील पदांवर सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने करावयाच्या नेमणुका / पदस्थापनेच्या प्रकरणांवर अंतिम निर्णय घेण्यासाठी अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग हे नियुक्ती प्राधिकारी राहतील. तथापि सदरहू संवर्गातील अन्य आस्थापनाविषयक (उदा. विभागातील नियुक्ती, विभागीय चौकशी, सेवानिवृत्तीविषयक प्रकरणे इत्यादी) बाबींसंदर्भात निर्णय घेण्यासाठी, संबंधित कर्मचारी ज्या विभागाच्या आस्थापनेवर कार्यरत आहेत त्या विभागाचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव हे नियुक्ती प्राधिकारी राहतील.

- दिनांक १६ मार्च २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये कार्यमुल्यमापन अहवाल महापार प्रणालीत ऑनलाईन पद्धतीने लिहिण्याकरिता ई-मेल आयडी प्राप्त करुन घेणेबाबत सुधारित कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे.

- दिनांक १७ मार्च २०१८ च्या शासन निर्णयान्वये वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-एक, अनुक्रमांक-१ ते ३ नुसार सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) व अधिनस्त कार्यालयातील "प्रशासकीय विभाग प्रमुख, विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख व कार्यालय प्रमुख" यांची यादी अद्ययावत करण्यात आली आहे.

- दिनांक १४ मार्च २०१८ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता सन २०१७-१८ मधील मार्च अखेर वेतन व वेतनेतर खर्चासाठी यशदा, पुणे या प्रशिक्षण संस्थेस एकूण रु.७६.८५ लाख इतके सहायक अनुदान वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

- दिनांक १४ मार्च २०१८ च्या शासन निर्णयान्वये डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेच्या ६० महिला प्रशिक्षणार्थी क्षमतेच्या वसतीगृह इमारतीच्या बांधकामास उर्वरित रु.९६.५९ लाख इतके योजनांतर्गत सहायक अनुदान वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

- दिनांक १५ मार्च २०१८ च्या शासन निर्णयान्वये डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेच्या २०० प्रशिक्षणार्थी क्षमतेच्या सुसज्ज वसतीगृहाच्या इमारत बांधकामास उर्वरित रु.१००.६६ लाख इतके योजनांतर्गत सहायक अनुदान वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

- दिनांक १५ मार्च २०१८ च्या शासन निर्णयान्वये राज्य प्रशिक्षण धोरणानुसार, मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर) पैठण, औरंगाबाद व डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थांच्या प्रशिक्षणविषयक बाबी व पदांचा सुधारित आकृतीबंध निश्चित करण्यासाठी महासंचालक, यशदा, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे.

- दिनांक २० मार्च २०१८ च्या शासन निर्णयान्वये यशवंतराव चव्हाण व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, पुणे या संस्थेस प्रशिक्षण शुल्काच्या अनिवार्य खर्चासाठी जानेवारी ते मार्च २०१८ या तीन महिन्यांकरिता वेतनेतरकरिता एकूण रु.११८.३३ लाख इतके अनिवार्य सहायक अनुदान (अंतिम हप्ता) मंजूर करण्यात आला आहे.

- दिनांक २० मार्च २०१८ च्या शासन निर्णयान्वये मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर), पैठण, औरंगाबाद या संस्थेस अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन यासाठी जानेवारी ते मार्च २०१८ या तीन महिन्यांकरिता वेतनेकरिता एकूण रु.०.५३ लाख इतके अनिवार्य सहायक अनुदान (अंतिम हप्ता) मंजूर करण्यात आला आहे.

- दिनांक २० मार्च २०१८ च्या शासन निर्णयान्वये डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेस विकास प्रशिक्षण व तद्नुषंगिक खर्च तसेच अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन यासाठी जानेवारी ते मार्च २०१८ या तीन महिन्यांकरिता वेतनेतर व वेतनेकरिता एकूण रु.९.६८ लाख इतके अनिवार्य सहायक अनुदान (अंतिम हप्ता) मंजूर करण्यात आला आहे.

- दिनांक १९ मार्च २०१८ च्या पत्रान्वये, केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालय क्रमांक-1/1/2018-E-II(B), दिनांक १५ मार्च २०१८ च्या कार्यालयीन ज्ञापनान्वये दिनांक १ जानेवारी २०१८ पासून लागू करण्यात आलेला २% वाढीव दराने महागाई भत्ता व ज्ञापनातील इतर तरतुदी महाराष्ट्र राज्य संवर्गातील अखिल भारतील सेवेतील अधिकाऱ्यांना लागू करण्यात आला आहे.

- दिनांक २३ मार्च २०१८ च्या शासन आदेशान्वये "सहायक कक्ष अधिकारी" मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा २०१५ मधील शिफारसप्राप्त श्री.सु.वि.अमृते यांचे मंत्रालयीन विभागात नियतवाटप करण्यात आले आहे.

- दिनांक २३ मार्च २०१८ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कुपरेज येथील कार्यालयात २५ आयपी बेस्ड सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यास व त्याकरिता येणाऱ्या रु.१३.८७ लाख इतक्या खर्चास मंजुरी देण्यात आली आहे.

- दिनांक २६ मार्च २०१८ च्या शासन निर्णयान्वये राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत मंजूर तरतुदीतून राज्य प्रशिक्षण नियंत्राण व मुल्यमापन यंत्रणा, यशदा, पुणे / ६ विभागीय व ३५ जिल्हा प्रशासकीय संस्थांना प्रशासकीय प्रशिक्षणाकरिता प्रशिक्षण शुल्कानुसार एकूण रु.४,३९,६१,२००/- इतका वेतनेतर सहायक अनुदान मंजूर करण्यात आला आहे.

- दिनांक २७ मार्च २०१८ च्या शासन निर्णयान्वये मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर), पैठण, औरंगाबाद या संस्थेस, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्या अधिनस्त असलेली १ हेक्टर व त्यावरील ४४० चौ.मी. बांधकाम क्षेत्र असलेली सागर दर्शन विश्रामगृह इमारत याची निश्चित केलेली रु.५४.८५ लाख इतकी मुल्यांकित रक्कम वितरित करण्याच्या प्रस्तावास काही अटींच्या अधीन राहून प्रशासकीय व वित्तीय मान्यता तसेच सदरहू निधी वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

- दिनांक २८ मार्च २०१८ च्या शासन निर्णयान्वये मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर), पैठण, औरंगाबाद या संस्थेस, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्या अधिनस्त असलेली २४५९.३६ चौ.मी. इमारत / मोकळी जागा हस्तांतरित होण्यासाठी रु.२,४५,८७,४१९/- इतकी मुल्यांकित रक्कम वितरित करण्याच्या प्रस्तावास काही अटींच्या अधीन राहून प्रशासकीय व वित्तीय मान्यता तसेच सदरहू निधी वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

- दिनांक २८ मार्च २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने श्री.रविंद्र भारती यांच्या मूळ अर्ज क्रमांक१०२३/१०१७ मध्ये दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने काही सूचना निलंबन आढावा समितीस केल्या आहेत.

- दिनांक २० मार्च २०१८ च्या शासन निर्णयान्वये उत्कृष्ट काम करणाऱ्या शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यासाठी "मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार योजना" ही अभिनव योजना सन २०१८-१९ पासून प्रथमत: मंत्रालय स्तरावर व त्यानंतर क्षेत्रीय कार्यालय स्तरावर सन २०१९-२० पासून कार्यान्वित करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.

### (ख) <u>बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल</u>

- भारतीय प्रशासन सेवेतील १८ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- एका अवर सचिवाची प्रशासकीय कारणास्तव बदली करण्यात आली आहे.

### <u>(ग) पदोन्नती / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक</u>

- सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील १ कर्मचाऱ्याला कक्ष अधिकारी पदावर तदर्थ पदोन्नती देण्यात आली आहे.
- एका अवर सचिवाच्या प्रपत्र बढतीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

**(घ) प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन**

- सहसचिव संवर्गातील एका अधिकाऱ्याचे प्रत्यावर्तन करण्यात आले आहे.

**(च) प्रशिक्षण**

- दिनांक १ मार्च २०१८ च्या शासन निर्णयान्वये सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा / विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यासंदर्भातील तरतुदींमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.
- दिनांक ७ मार्च २०१८ च्या शासन निर्णयान्वये लिपिक-टंकलेखक सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा २०१८ ला पुन्हा (Repeater) बसू इच्छित असलेल्या उमेदवारांचे अर्ज दिनांक ३१ मार्च २०१८ पर्यंत पाठविण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

**(छ) ज्येष्ठतासूची**

- दिनांक २७ मार्च २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील २५ वरिष्ठ स्वीय सहायकांची दिनांक १ जानेवारी २०१८ रोजीची अंतरिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २७ मार्च २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील ४३ निवडश्रेणी लघुलेखकांची दिनांक १ जानेवारी २०१८ रोजीची अंतरिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २७ मार्च २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील २३७ उच्चश्रेणी लघुलेखकांची दिनांक १ जानेवारी २०१८ रोजीची अंतरिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २७ मार्च २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील २०८ निम्नश्रेणी लघुलेखकांची दिनांक १ जानेवारी २०१८ रोजीची अंतरिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २७ मार्च २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील ८३ लघुटंकलेखकांची दिनांक १ जानेवारी २०१८ रोजीची अंतरिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

***********